रात चांदणी, गंध चंदनी

तीः रात चांदणी, गंध चंदनी
आज लोचनी हवास तू ।
तोः रात चांदणी, गंध चंदनी
आज लोचनी हवीस तू ॥ धृ. ॥

तोः नकोस पाहू, नकोस ऐकू
प्रितीचे हितगुज फुला ।
तीः नयन पाहू दे, नयन ऐकू दे
आळवू दे अनुराग मला ।
धुंद छेडुनी विरह रागिणी
सूर बंधनी हवास तू ॥ १ ॥

तीः सहज बोलले, उगीच हासले
आणि विसरले मीच मला ।
तोः काहीन कळले, अंतर सरले
जीव अचानक मोहरला ।
लाजलाजुनी एक चांदणी
बोलली मनी हवास तू ॥ २ ॥

तोः मिटुन पापणी घेता सजणी
जाणवते का जाग उरि ?
तीः चंद्र चैतनी तुला पाहुनी
लाज कशाला या अधरी ?
स्वप्न मिलनी, चित्त कोंदणी
आज चिंतनी हवास तू ॥ ३ ॥